स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसंदर्भात मतदार जागृतीबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेल

क्रमांक-रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२७/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -३२.
दिनांकः- २१/०९/२०१६.

प्रति,
मा. सचिव तथा महासंचालक,
माहिती व जनसंपर्क संचालनालय,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२.

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसंदर्भात मतदार जागृतीबाबत...
संदर्भ:- मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय यांच्यासमवेत केलेल्या चर्चेसंदर्भात...

आपल्याला माहितच आहे की, राज्यामध्ये २१४ नगर परिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिका यांच्या मुदती डिसेंबर-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीत संपणार आहेत. त्यापूर्वी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत.

२. या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मोठया प्रमाणावर जनजागृती कार्यक्रम (नवीन मतदार नोंदणी, मतदानाची टक्केवारी वाढविणे) राबविण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार खाली दर्शविल्याप्रमाणे मोठया प्रमाणावर जनजागृती कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे :-

| | दिनांक | स्थानिक स्वराज्य संस्था | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| (i) | १६/९/२०१६ ते १४/१०/२०१६ | जिल्हा परिषद/पंचायत समिती महानगरपालिका | नवीन मतदार नोंदणी, मतदार यादी अद्ययावत व बिनचूक करणे. |
| (ii) | १/११/२०१६ ते ३०/११/२०१६ | नगर परिषदा/नगर पंचायती | मतदानाची टक्केवारी वाढविणे. |
| (iii) | १५/१/२०१७ ते १५/२/२०१७ | जिल्हा परिषद/पंचायत समिती महानगरपालिका | मतदानाची टक्केवारी वाढविणे. |

२. वरील कार्यक्रम जास्ती जास्त मतदारांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या माध्यमातून आपण आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी, ही विनंती. उदा. -

| | | |
|---|---|---|
| (i) | जय महाराष्ट्र व दिलखुलास कार्यक्रम- | मा. राज्य निवडणूक आयुक्त यांची मुलाखत प्रसारित करणे. |
| (ii) | जय महाराष्ट्र व दिलखुलास कार्यक्रम- | जिंगल्स प्रसारित करणे. |
| (iii) | लोकराज्य मासिक - | वरील विषयांबाबत लेख प्रसिध्द करणे. |
| (iv) | मंत्रालयासमोर व इतर महत्वाच्या ठिकाणी होर्डिंग्जवर -(संलग्न) | जाहिरात प्रकाशित करणे. |
| (v) | स्थानिक वृत्तपत्रे - | लेख व बातम्या प्रसिध्द करणे. |
| (vi) | स्थानिक केबल वाहिन्या - | जनहितार्थ संदेश प्रसारित करणे. |
| (vii) | शासनाच्या सर्व विभागांच्या जाहिराती व टेंडर इत्यादीमध्ये दर्शनी भागावर (वर व खाली) | वरील विषयाबाबत संदेश प्रसारित करणे, इत्यादी. |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(एम.एम. चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता -

१) सर्व जिल्हाधिकारी

२) सर्व जिल्हा माहिती अधिकारी

F:\राज्य निवडणूक आयुक्तांनी डिक्टेट केलेली पत्र\मतदार जागृतीबाबत २०.९.२०१६.docx

# महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक- २०१७

**भारत निवडणूक आयोगाची मतदार नोंदणी मोहीम**

**१६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६**

**१ जानेवारी २०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण होत असल्यास... मतदार म्हणून नाव नोंदवा.**

मृत, दुबार अथवा स्थलांतरीत मतदारांची नावे वगळण्याचीही संधी

आणि हो लक्षात ठेवा !

महानगरपालिका, जि. प./ प.स. च्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करण्यासाठी १४ ऑक्टोबर २०१६ पर्यंत विधानसभेच्या मतदार यादी नावे नोंदवा किंवा तपशिलांत दुरुस्ती करा

अधिक माहितीसाठी मतदार नोंदणी अधिकारी, महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय किंवा नजीकचे मतदान केंद्र

संकेतस्थळ: https://ceo.maharashtra.gov.in

टोल फ्री हेल्पलाईन: १८००-२२-१९५०

**मतदार यादीत नाव नोंदवा! मतदानाचा हक्क मिळवा!**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**